थोडक्यात

वळसेमळा येथे बिबट्या जेरबंद

निरगुडसर : निरगुडसर ता. आंबेगाव येथील वळसे मळा येथे बिबट्याला पकडण्यासाठी लावलेल्या पिंजऱ्यात बिबटया जेरबंद झाला असून बिबट्या पकडला गेल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी, नागरिकांनी सुटकेचा निष्वास सोडला आहे.

निरगुडसर येथून जवळच असलेल्या वळसेमळा येथे सोमवारी रात्रीच्या वेळी बिबट्या मुख्य रस्त्याच्या बाजूला फिरताना स्थानिक नागरिकांना दिसला होता. त्यामुळे या ठिकाणी पिंजरा लावावा अशी मागणी स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांनी वन विभागाकडे केली होती. वनविभाग तात्काळ पिंजरा लावेल अशी खात्री नसल्याने निरगुडसरचे ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब वळसे, धनेश वळसे पाटील, कैलास वळसे पाटील यांनी स्वखर्चाने गाडी करून टेमकर मळा येथे असलेला पिंजरा मंगळवारी वळसे मळा येथे आणून वन विभागाचे कर्मचारी, स्थानिक शेतकरी राहुल वळसे पाटील, हरिष वळसे पाटील, ओमकार हिंगे, संदेश वळसे पाटील यांच्या मदतीने लावला होता. त्या पिंजऱ्यात गुरुवारी रात्री साडेसात वाजता बिबट्या जेरबंद झाला आहे. दरम्यान पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला असला तरी बिबट्याला पकडण्यासाठी स्वखर्चाने पिंजरा आणून लावावा लागत असल्याने ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब वळसे पाटील यांनी वनविभागाबाबत नाराजी व्यक्त केली.

मांज्यात अडकलेल्या कावळ्याची सुटका

शिरूर : या झाडांवरून त्या झाडावर फिरणे आणि आकाशात स्वच्छंद विहार करणारा आणि काव काव असा तोंडाने आवाज करणारा कावळा आज पहाटे शिरूर शहरातील मुंबई बाजार येथील हनुमान मंदिरावजवळचा पिंपळाचा झाडावरील मांज्या मध्ये अडकला. या अडकलेल्या कावळ्याची स्थानिक तरूण व वनखात्याच्या कर्मचा-यांनी सुटका केली.

झाडावरील मांज्या मध्ये कावळ्या अडकल्या असून तो सुटका करण्याचे प्रयत्न करीत असल्याचे स्थानिकांना दिसून आल्यावर तातडीने वनखात्याला याबाबत स्थानिक युवकांनी कळविले. त्याठिकाणी त्वरित वनरक्षक दिनेश गोरड व समीर धरणे यांनी धाव घेतली. त्यांना मनसेचे माजी शहराध्यक्ष संदीप कडेकर, रवींद्र भिसे ,संतोष जामदार , यांनी मदत केली. या सर्वांनी झाडांवरील मांज्यात अडकलेल्या कावळ्याची सुटका केली. मांज्यातून सुटका झाल्या बरोबर कावळ्याने आकाशात धूम ठोकली. दरम्यान कावळा झाडावरील मांज्यात अडकल्याने मोठ्या संख्येने कावळे त्याठीकाणी जमा झाले होते.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

पिंपरी : स्त्रियांच्या अंधाऱ्या जीवनात ज्ञानाच्या ज्योती पेटवून स्त्रीशिक्षणाचा मार्ग मोकळा करण्याचे काम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. शिक्षण हे प्रगतीचे माध्यम असून त्याद्वारे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळते. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या या आदर्शांवर चालून शिक्षणाने स्वतःला सक्षम करून समाजात समानतेचा प्रकाश पसरविण्याचे ध्येय प्रत्येक स्त्रीने अंगी बाळगले पाहिजे, असे मत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील यांनी व्यक्त केले.

पुणे : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस पुणे जिल्हा दौऱ्यावर असताना आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी चे दर्शन घेतले. माध्यमांशी बोलताना त्यांनी आमची जी परंपरा आहे ती वारकरी विचारांची आहे संत ज्ञानेश्वर महाराज संत तुकाराम महाराज विचाराने महाराष्ट्र जो पुढे गेला आहे तोच भविष्यातही पुढे जाणार आहे इंद्रायणी नदीचे प्रदूषण एवढं सहजासहजी सोपं नाहीये त्यासाठी व्यवस्था तयार करावी लागते ग्रामपंचायत महानगरपालिका या सर्वांना सांड पाण्याविषयी बोलण्यात आले आहे येणाऱ्या काळात इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्त करण्याचे काम युद्ध पातळीवर करणार आहे असे देवेंद्र फडणवीस माध्यमांशी बोलले. वारकरी परंपरा महाराष्ट्राला दिशा देणारी आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी १०३ अट्टल गुन्हेगारांना केले स्थानबद्ध

पुणे / प्रतिनिधी

शहराच्या विविध भागात दहशत माजवून सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणार्या अट्टल गुन्हेगारांविरुद्ध पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी एमपीडीए कायद्याचे हत्यार उपसले. गेल्या वर्षभरात पोलीस आयुक्तांना तब्बल १०३ गुन्हेगारांना एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे.

अमितेशकुमार यांची पुणे पोलीस आयुक्तपदी ३१ जानेवारी २०२४ रोजी नियुक्ती झाली आहे. त्यांनी अट्टल गुन्हेगारांना एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्याचे कठोर धोरण राबविले. विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये खुनाचा प्रयत्न, खंडणी, गंभीर दुखापत, जबरी चोरी, वाहन तोडफोड, दंगल, बेकायदेशीर अग्निशस्त्रे, हत्यारे बाळगणे, गावठी हातभट्टी निर्मिती व विक्री अशा स्वरुपाचे गंभीर गुन्हे करुन दहशत निर्माण करणार्या व सार्वजनिक सुव्यवस्था बाधित करणार्या १०३ अट्टल गुन्हेगारांना नागपूर, चंद्रपूर, अकोला, अमरावती, कोल्हापूर, नाशिक अशा राज्यातील विविध कारागृहामध्ये एक वर्षाकरीता स्थानबद्ध केले आहे.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी अट्टल गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यासाठी मोक्का एमपीडीए सेल सुरु केला भाईगिरी करणार्यांविरुद्ध झोपडपट्टी प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) कारवाईसाठी पीसीबी विभागाला वेळोवेळी रेकॉर्ड प्राप्त करावे लागते. संबंधित गुन्हेगाराची मागील पाच वर्षातील गुन्ह्यांची माहिती एकत्रित करुन त्यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांचा पाठपुरावा करुन एमपीडीएनुसार कारवाईला वेग दिला जातो. त्यानंतर सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन पोलीस आयुक्त एमपीडीएनुसार कारवाई करुन राज्यातील कोणत्याही कारागृहात गुन्हेगाराला एक वर्षासाठी स्थानबद्ध करतात.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी अवघ्या ११ महिन्यात एमपीडीए कारवाईचे शतक पार केले. यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांच्या कृत्यांना आळा घालण्यासाठी अधिकाधिक कठोर व प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येईल, असे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली मोक्का एमपीडीए सेलचे अधिकारी, अंमलदार तसेच पोलीस ठाण्यातील सर्व्हेलस पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी ही कामगिरी केली आहे.

कोयत्याने परस्परावर वार, आठ जण गंभीर जखमी

पिंपरी / प्रतिनिधी

आम्ही इथले दादा असे म्हणून एकमेकांना खुन्नस देणार्या दोन टोळ्या परस्परांवर भिडल्या. एकमेकांवर हल्ला करुन खुनाचा प्रयत्न केला.

आम्ही इथले दादा असे म्हणून एकमेकांना खुन्नस देणार्या दोन टोळ्या परस्परांवर भिडल्या. एकमेकांवर हल्ला करुन खुनाचा प्रयत्न केला. त्यात आठ जण जखमी झाले आहे. चिखलीतील पाटीलनगरमधील डिफेन्स कॉलनीत १ जानेवारी रोजी रात्री आठ वाजता हा राडा झाला. याबाबत स्वप्नील बाळासाहेब राक्षे (वय २६, रा. भांगरे कॉलनी, पाटीलनगर, चिखली) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी साहिल गायकवाड(वय १८, रा. भांगरे कॉलनी, पाटीलनगर, चिखली) याला अटक केली आहे. त्याचे साथीदार ऋषिकेश ऊर्फ सोन्या बाळासाहेब चव्हाण, लखन शेख, नितेश तुपे व इतर चार यांच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या परिसरात राहणारे आरोपी यांनी फिर्यादी यांना तु माझेकडे का पाहतोस, या कारणावरुन चिडून जाऊन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यांच्याकडील कोयते बाहेर काढून परिसरात दहशत पसरविण्यासाठी ते हवेत फिरवून आम्ही इथले दादा आहोत, असे म्हणून फिर्यादी व त्यांचे मित्र वैभव कृष्णा पाटील, रवी प्रदीप सुरवसे यांना कोयत्याने डोक्यावर व हातावर वार करुन जखमी केले.

या विरोधात साहिल मनोज गायकवाड (वय १८, रा. डिफेन्स कॉलनी, पाटीलनगर, चिखली) याने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन स्वप्नील बाळासाहेब राक्षे (वय २६, रा. भांगरे कॉलनी, पाटीलनगर, चिखली), वैभव कृष्णा पाटील (वय २२, रा. तुकारामनगर, तळवडे), रवी प्रदीप सुरवसे (वय २९, रा. रिव्हर रेसिडेन्सी, जाधववाडी, चिखली) यांना अटक केली आहे.

फिर्यादी यांच्या परिसरात राहणार्या आरोपींनी तू आमचेकडे का बघतोस या कारणावरुन चिडून जाऊन जिवे ठार मारण्याची धमकी देऊन कोयता बाहेर काढून दहशत पसरवली. मी इथला भाई आहे, तुला जिवे ठारच मारतो, असे म्हणून फिर्यादी व त्यांचा मित्र ऋषिकेश ऊर्फ सोन्या बाळासाहेब चव्हाण, लखन शेख ,नितेश तुपे व साहील शेख यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशो कोयत्याने हातावर वार करुन जखमी केले. पोलीस उपनिरीक्षक मासाळ तपास करीत आहेत.

शरद मोहोळच्या खुनाचा बदला घेण्याचा कट

पुणे : पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने शरद मोहोळ याच्या हत्येचा बदला घेण्याच्या तयारीत असणाऱ्या दोघांना अटक केली आहे. शरद शिवाजी मालपोटे (२९, रा. सुतारदारा, कोथरूड) आणि संदेश लहू कडू डरपवशीह डरर्ही घरर्वी (२४, काळूबाई कॉलनी, कोथरूड) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. या दोघांच्या ताब्यातून यांना २ पिस्तुल आणि ७ जिवंत काडतुसही जप्त करण्यात आले आहेत. गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकाने ही कारवाई केली. दोघांना अटक केली असली तरीही यात आणखी काही जणांचा समावेश आहे. लवकरच त्यांनाही अटक केली जाईल,अशी ही माहिती समोर आली आहे. कुख्यात गुंड शरद मोहोळ याच्यावर ५ जानेवारी २०२४ ला गोळ्या झाडून खून करण्यात आला होता. या घटनेला आता एक वर्षाचा कालावधी पूर्ण होईल. अशातच शरद मोहोळ याच्या हत्येचा बदला घेण्याच्या तयारीत असणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केल्याची माहिती आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या दोघांनीही शरद मोहोळ हत्येचा बदला घेण्याची पूर्ण तयारी केली होती. त्यासाठी या दोघांनी पिस्तूल हे आणले होते. आणि हे दोघेही संधीच्या शोधात होते. मात्र त्यापूर्वीच गुन्हे शाखेच्या पोलिसांना त्यांच्या या कटाचा सुगावा लागला आणि त्यांनी या दोघांना सापळा रचून अटक केली. कुख्यात गुंड शरद मोहोळचा (दि.५ जानेवारी) भरदुपारी त्याच्या सुतारदरा येथील घरासमोर गोळ्या झाडून खून करण्यात आला होता. शरद मोहन सोबत सतत असलेल्या साहिल उर्फ मुन्ना पोळेकर व साथीदारांनी गोळ्या झाडून खून केला होता. शरद मोहोळ याच्यावर ३ जणांनी गोळ्या झाडल्या होत्या. कोथरूड पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल होता. तपासा दरम्यान या गुन्ह्यात १७ आरोपी निष्पन्न झाले. मुळशीतील विठ्ठल शेलार टोळी या खुनामागे असल्याचे निष्पन्न झाले होते.

परप्रांतीय केअर टेकर तरुणानेच ८० वर्षाच्या ज्येष्ठाचे हातपाय बांधून चाकूचा धाक दाखवून रोकड पळविली

पुणे / प्रतिनिधी

केअर टेकर म्हणून नेमलेल्या तरुणानेच ८० वर्षाच्या ज्येष्ठाचे हातपाय बांधून चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम व मोबाईल चोरुन नेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

केअर टेकर म्हणून नेमलेल्या तरुणानेच ८० वर्षाच्या ज्येष्ठाचे हातपाय बांधून चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम व मोबाईल चोरुन नेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुदैवाने त्यांनी आरडाओरडा केल्याने शेजारच्यांनी येऊन त्यांची सुटका केली.

याबाबत त्यांचा मुलगा रवींद्र प्रसाद अग्रवाल (वय ५६, रा. गंगा मेलरोजी, सोपानबाग) यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी चिंटु चर्तुवेदी (वय १९, रा. कुम्हारी, ता. अमरपटन, जि. सतना, मध्य प्रदेश) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार कोरेगाव पार्क येथील अग्रसेन सोसायटीत १ जानेवारी रोजी सकाळी पावणे सात ते साडेसात वाजेच्या दरम्यान घडला.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे वडिल प्रसाद अग्रवाल ८० वर्षांचे असून अग्रसेन सोसायटीत ते एकटेच राहतात. फिर्यादी हे आपल्या कुटुंबासह सोपानबाग येथे राहतात. वडिलांच्या देखभालीसाठी १५ ते २० दिवसांपूर्वी चिंटु चर्तुवेदी याला नेमले होते. तो सकाळीच येऊन घरातील काही कामे व वडिलांना काय हवे नको ते पहात असे. १ जानेवारी रोजी तो नेहमीप्रमाणे सकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान आला. त्याने बेडरुममध्ये वडिलांना नॉयलॉनच्या दोरीने बांधले. रुमालाने तोंड बांधुन त्यांना चाकूचा धाक दाखविला. तेरे पास जितना पैसा है, वह मुझे दे दे, नही तो यही चाकू से तेरे को मार दुंगा, अशी जीवे मारण्याची धमकी दिली. त्यांच्याकडे असलेली रोख रक्कम व मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. त्यांना बेडरुममध्ये बंद करुन तो पळून गेला. फिर्यादी यांचे वडिल प्रसाद अग्रवाल यांनी कसेतरी करुन तोंडावर बांधलेला रुमाल बाजूला करुन आरडाओरडा केला. त्यांचा आवाज ऐकून शेजारी राहणार्यांनी घरात येऊन त्यांची सुटका केली. पोलीस उपनिरीक्षक शांतामल कोळ्ळुरे तपास करीत आहेत.

पुणे महानगरपालिका
पाणीपुरवठा विभाग
निविदा प्रक्रिया कक्ष
निविदा जाहिरात फेरनिविदा कामे

अ. क्र	टेंडर क्रमांक	विक्री कालावधी/स्विकृती दिनांक	तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक
१	PMC/water supply/ 2024/309	०६/०१/२०२५ पासून १३/०१/२०२५	१४/०१/२०२५

बाकीचा मजकूर यापूर्वी प्रसिद्ध झाल्यानुसार कायम राहील.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पर्वती जलकेंद्र
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/११६१ दि.०३/०१/२०२५

गांजा विक्री प्रकरणी दोघांना अटक

पुणे : गांजा विक्री प्रकरणी अमली पदार्थ विरोधी पथकाने दोघांना अटक केली. त्यांच्याकडून १० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई बावधन येथे करण्यात आली. महेश चंद्रकांत कमलापुरे (वय ३८), विशाल अरुण वाल्हेकर (वय ३०, दोघे रा. कात्रज, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्यासह शिवदास बबन पवार (रा. धाराशिव) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सदानंद रुद्राक्षे यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बावधन येथे अभिदांते चौकात एक रिक्षा आली असून त्यामध्ये गांजा आणला असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली.

ग्रामपंचायत आपटी, ता. शिरूर, जि. पुणे
खुली निविदा सूचना
बी-१ सूचना क्र. २ सन २०२४-२५

सरपंच, ग्रामपंचायत आपटी, ता. शिरूर, जि.पुणे यांचे अंतर्गत तर्फे जि.प.पुणे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत आपटी, ता. शिरूर जि .पुणे यांच्याकडून दि. ०४/०१/२०२५ ते दि. १०/०१/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व भरून पाठविलेले मोहरबंद निविदा दि. ०४/०१/२०२५ ते दि. १०/०१/२०२५ पर्यंत दु. ०४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत आपटी, ता. शिरूर येथे स्वीकारण्यात येतील. मोहरबंद निविदा दि. ११/०१/२०२५ रोजी दु. ०५.०० वा. उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम रु.	निविदा फी रु.	ठेकेदार वर्गीकरण	कामाचा कालावधी
१.	मौजे आपटी येथील गावठाण येथे बंदिस्त गटर करणे, ता. शिरूर (१५ वा वित्त आयोग)	२,०७,५७४/-	२३६/-	सु. बे अभियंता	६ महिने
२	मौजे आपटी येथील गावठाण येथे बंदिस्त गटर करणे, ता. शिरूर (१५ वा वित्त आयोग)	१,४३,८७१/-	२३६/-	सु. बे अभियंता	६ महिने
३	मौजे आपटी येथील वॉल चेंबर बांधकाम दुरुस्ती करणे, ता. शिरूर (१५ वा वित्त आयोग)	१,२०,८४६/-	११८/-	सु. बे अभियंता	६ महिने
४	मौजे आपटी येथील अंगणवाडी वॉटरप्रुफिंग करणे, ता. शिरूर (१५ वा वित्त आयोग)	८३.०० हजार	११८/-	सु. बे अभियंता	६ महिने
५	मौजे आपटी येथील अंगणवाडी शौचालय बांधकाम करणे, ता. शिरूर (१५ वा वित्त आयोग)	४७.०० हजार	११८/-	सु. बे अभियंता	६ महिने

१. कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. **२.** कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रामपंचायत आपटी ता. शिरूर येथे भरून निविदा उपलब्ध होतील. **३.** ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी दाखला सादर करणे आवश्यक आहे. **४.** कोऱ्या निविदा रक्कमेच्या १% इसारा रक्कम कोणत्याही बँकेचा डी. डी ग्रामपंचायत आपटी या नावे असलेला लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय आर्थिक लिफाफा उघडला जाणार नाही. **५.** कोऱ्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे १. निविदा फी पावती, २.नोंदणी प्रमाणपत्र, ३. प्राप्तीकर प्रमाणपत्र, ४. वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
(श्री. शंकर बाळासाहेब भाकरे)
ग्रामपंचायत आपटी, ता. शिरूर, जि.पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत आपटी, ता. शिरूर, जि.पुणे

एल्&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 02.01.2025 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. राहुल मोहन भोसले 2. शीतल राहुल भोसले	अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : फ्लॅट क्र. 1, 1ला मजला, अधिमापन 614 चौ.फू., म्हणजेच 57.06 चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ, इमारतीचे नाव ''चंद्रभागा अंगण'', बांधलेल्या मालमत्तेचा सर्व्हे क्र. 36, हिस्सा क्र. 1/3 अधिमापन 06 एर, आंबेगाव येथे स्थित, तालुका : हवेली, जि.: पुणे, महाराष्ट्र 411046	H18488120621045756 / H18488130621054503	25 नोव्हेंबर 2024	रु. 2,23,496/-	रु. 34,96,011.69/-	रु. 22,34,960/-	कामकाजाच्या सर्व दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पूर्वनियोजित भेटीसह.	21/02/2025 सकाळी 10 ते दुपारी 12 वाजेपर्यंत.

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **20/02/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **21/02/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **22/02/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे नाव आहे : **शेखर काळे, संपर्क क्र.9823271111, एल अँड टी फायनान्स लि., कार्यालय क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126, एल अँड टी फायनान्स लि. ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 04.01.2025
ठिकाण: पुणे

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com